औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची शुक्रवार दि. ३०.११.९० रोजी झालेल्या ५६ व्या सभेचा कार्यवृत्तांत.

---

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| मा. श्री. ईश्वर भोसीकर | सभापती औ. मं |
| मा. श्री. अरविंद महाजन | उपसभापती औ. मं |
| मा. श्री. मुन्शीलाल गौतम | |
| आयुक्त म. न. पा. औरंगाबाद. | सदस्य |

विभागीय आयुक्त औरंगाबाद/नासिक, प्रशासक म. न. पा. नासिक उपसंचालक नगररचना हे पूर्वसूचनेनुसार बैठकीस अनुपस्थित होते.

विषय क्र. १: दिनांक ३०.१०.९० रोजी झालेल्या ५५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ३२०

दिनांक ३०.१०.९० रोजी झालेल्या ५५ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतवर सविस्तर चर्चा होऊन कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: मुखेड जि. नांदेड येथील गृहनिर्माण योजना.

ठराव क्र. ३२१

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, मुखेड न.प. ने गृहनिर्माण योजना कार्यान्वीत करण्यासाठी मंडळास देऊ केलेली जमिन व तिची कळविलेली किंमत जिल्हाधिकारी नांदेड व नगररचना आणि मुल्यनिर्धारण खात्याने काढलेल्या मुल्याचे आधारे निश्चित करुन त्यास प्राधिकरणाची व शासनाची मान्यता घ्यावी तसेच वसाहतीला बाहयसुविधा पुरविण्याचा ठराव नगरपालिकेने करुन हया कार्यापोटी आवश्यक रक्कम मंडळाकडे मुखेड न. प. ने. भरणे आवश्यक आहे. याच अटीवर मुखेड येथे गृहनिर्माण योजना राबवावी. प्राधिकरणाची [म्हाडा अधिनियम १९७६ च्या कलम २८ अनुसार] मान्यता घेण्यास्तव सदर प्रस्ताव प्राधिकरणास पाठवावा.

विषय क्र.३: मंडळाच्या एकनाथनगर वसाहतीमध्ये "महात्माफुले ग्रंथालय" औरंगाबाद हया संस्थेला ग्रंथालयाकरिता जमिन देण्याबाबत.

ठराव क्र. ३३२

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, " महात्माफुले ग्रंथालय " हया संस्थेला ग्रंथालयाकरिता जमिन देण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेकडून तसेच एकनाथनगर वसाहत धारकांच्या सहकारी संस्थेकडून आवश्यक " ना हरकत प्रमाणपत्र" मागवून ते प्राप्त झाल्यानंतर विशेष प्रकरण म्हणून महात्माफुले ग्रंथालयास जागा वाटप करण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे मंजूरीस्तव पाठवावा.

विषय क्र. ४: रामनगर जालना येथील १३३ गाळे [डीआरटी, एसआरटी] व अल्पत्प उत्पन्न गट ११४ गाळे या वसाहतीमधील मलनि:सारण योजनेबाबत.

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळास माहिती दिली की, रामनगर जालना येथील वसाहतीतील बाहयसुविधाचे नुतनीकरण करण्याविषयी मा. गृहनिर्माणमंत्री यांच्याशी जालना मुक्कामी दि.२९.११.९० रोजी चर्चा केली. मा. मंत्रीमहोदयांनी सांगितले की, सुविधांचे नुतनीकरण करण्यासाठी शासन ५०% निधी देईल व नगरपालिकेने ५०% निधी द्यावा. अनुदानासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवावा अशी सूचना मंत्रीमहोदयांनी केल्याचे उपसभापतींनी सांगितले.

यावर मा. सभापतींनी सूचना केली की, ११४ गाळ्यांच्या योजनेतील अन्स्पीसिपेटेड लायबिलीटीजमधून रु.८७,२२६ न.प.ला ५०% रक्कमेपोटी म्हणून द्यावे व त्यांना बाहयसुविधांचे काम करण्यास सांगावे व शासनाकडे प्रस्ताव पाठवून वसाहतीतील बाहयसुविधासाठी निधी उपलब्ध करुन घ्यावा व निधी प्राप्त झालेवर रु.८७,२२६ त्यातून वळते करुन घ्यावे.

...३

ठराव क्र. ३२३

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने सर्वानुमते असा निर्णय घेतला की, रामनगर वसाहतीतील बाहयसुविधाचे नुतनीकरण करण्यासाठी अंदाजपत्रकाच्या ५०% रक्कम न.प. ने खर्च करावी व ५०% रक्कम शासन अनुदानातुन खर्च करावी. ११४ गाळयाच्या योजनेत रू.८७२२६/- ॲन्टीसिपेटेड लायबिलीटीज या शिर्षकाखाली ठेवलेली रक्कम ५०% रक्कमेपोटी न.प. स द्यावी व त्यांना काम सुरू करण्यास सांगावे तसेच बाहयसुविधाचे नुतनीकरण करण्यासाठी शासनाकडे ५०% निधी उपलब्ध होण्यासाठी प्रस्ताव पाठवावा. शासनाकडून निधी प्राप्त झालेवर वरील रक्कम रु. ८७,२२६/- पुन्हा योजनेच्या खाती जमा करावी.

विषय क्र.५:- आर-२९, एन-७ सिडको, औरंगाबाद येथील प्रायोगिक तत्वावरील मध्यम उत्पन्न गट योजनेतील गाळे बांधणे.

ठराव क्र. ३२४

या बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, सुधारीत प्रशासकीय मान्यतेकरिता प्रसताव प्राधिकरणाकडे पाठवावा. निविदाकाराने वाटाघाटीनंतर कमी केलेला १४% जादाचा दर वाजवी असल्यामुळे स्विकृत करून कामास सुरूवात करावी. कारण पेट्रोल व डिझेलचे वाढलेले दर विचारांत घेता पुन्हा निविदा बोलावल्यास त्यापेक्षा कमी दर प्राप्त होणार नाहीत. निविदेची रक्कम रू. ३,६९,२७५/- असल्यामुळे निविदा स्विकृतीचे अधिकार मुख्य अधिकारी यांनाच आहेत. त्यामुळे त्यांनी नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

विषय क्र.६: औरंगाबाद मंडळाचे स्टेशनरोड, देवगिरी कॉलेजच्या जवळील दुकान क्र ८ व २१ च्या बाबत.

ठराव क्र. ३२५

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, श्रीमती कांचनमाला या विधवा असल्याने व त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांनी मंडळास वेळोवेळी केलेल्या विनंत्याचा विचार करून त्यांनी व त्यांचे पुत्र श्री. मनोज कुमार ब्रम्हेचा यांनी देवगिरी

..

कॉलेजजवळील दुकान क्र. ८ व २१ साठी निविदासोबत प्रत्येकी भरलेली रक्कम रु. १०,००० मंडळाला आलेला खर्च वजा जाता परत करण्यासाठी विशेष बाब म्हणून मंजूर करून प्राधिकरणास कळवावे.

विषय क्र.७: औरंगाबाद गृहनिर्माण मंडळाने सर्व्हे क्र.५४ गारखेडा येथे बांधलेल्या ४४४ गाळ्यापैकी विडी कामगारांसाठी वितरीत करण्यांत येणाऱ्या ३०० गाळ्यांबाबत.

. . . . .

या विषयावर चर्चा करतांना मंडळास उपसभापतींनी माहिती दिली की, गारखेडा येथे गृहनिर्माण मंडळाने एकुण ४४४ गाळे अल्प उत्पन्न गटान्तर्गत बांधलेले आहे. यापैकी ३०० गाळे विडी कामगारा साठी बांधलेले आहे. गाळे वाटपासाठी विडी कामगारांची पात्रता ठरविण्यांत आली आहे. विडी कामगारांनी अर्जासोबत रु. ५००/- भरले आहे व गाळा ताब्यात घेण्यापुर्वी रु. १९३१/- भरावयाचे आहे. त्यासाठी त्यांना पत्र पाठविण्यांत आले आहे. विडी कामगारांचे नेते श्री. विजयेंद्र काबरा यांनी मुख्याधिकारी यांची भेट घेऊन विनंती केली की, विडी कामगारांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे वरील रक्कम भरणे शक्य नाही. तेंव्हा त्यांना रक्कम भरण्यामध्ये काही सुट आहे काय याची विचारणा केली.

चर्चेत भाग घेतांना सभापतींनी सांगितले की, विडी कामगारां कडून रु. ५००/- घेऊन गाळ्यांचा ताबा द्यावा व उर्वरीत रक्कम पुढील मासिक हप्त्यात वसुल करावी.

उपसभापतींनी सांगितले की, जर गाळ्यांचा ताबा दिला नाही तर गाळ्यांचे नुकसान होईल, तुटफुट व चोरी होण्याची शक्यता असल्यामुळे वॉच अण्ड वॉर्डवर मंडळास खर्च करावा लागेल व पर्यायाने लाभधारकांवर हा खर्च पडेल.

ठराव क्र. ३२६

या विषयावर चर्चा करुन मंडळाने असा निर्णय घेतला की, विडी कामगारांची आर्थिक परिस्थिती रु. १५३१/- भरण्यासारखी नसल्याने त्यांच्याकडून रु. ५००/- व करार करून घेऊन त्यांना गाळ्यांचा ताबा द्यावा व उर्वरीत रक्कम ही पुढील मासिक समान हप्त्यात वसुल करावी.

मा. सभापतींच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

विषय क्र. १: सर्व्हे क्र. ४५ शाहानुरवाडी येथील भूखंडावर उच्च उत्पन्न गट योजनेतील ४३ गाळे बांधकामा बाबत प्राप्त झालेल्या निविदाबाबत.

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी माहिती दिली की, सदरच्या विषयावर दिनांक ३०.१०.९० रोजी मंडळाच्या ५५ व्या सभेत ठराव क्र ३१८ अन्वये असा निर्णय घेतला होता की, सदर कामासाठी परत निविदा बोलविण्यांत याव्यात.

यापुढे उपसभापतींनी सांगितले की, मुख्य अभियंता/प्राधिकरण हे दिनांक १५.११.९० रोजी औरंगाबाद येथे दौ-यावर आले असता त्यांनी मे. लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कं. सोलापूर यांचे सिडकोकडील इएसआय दवाखान्याचे सुरू असलेल्या कामास भेट दिली आणि संबंधीत निविदा कागदपत्रांची छाननी केली व असा अभिप्राय दिला की, ठेकेदाराचे काम अत्यंत उत्तम दर्जाचे आहे. मुख्य अभियंता/प्रा. यांनी सांगितले की, ठेकेदारांनी वाटाघाटीने नमुद केलेला दर हा वाजवी आहे. पेट्रोल व डिझेलचे दर वाढल्याने बांधकाम साहित्याचे दरात वाढ झाली आहे. त्याचा विचार करता पुन्हा निविदा बोलविल्यास आता वाटाघाटीनंतर प्राप्त झालेल्या दरापेक्षा जास्त दर येतील व त्यामुळे त्याचा आर्थिक बोजा लाभधारकांवर पडेल सबब मे. लक्ष्मीकन्स्ट्रक्शन सोलापूर हयांची वाटाघाटीने कमी केलेले दर ११.९५% जादाची निविदा मंजूर करणे हिताचे होईल. उपसभापतींनी सांगितले की, ठेकेदारास दर कमी करणेबाबत पुन्हा विचारणा केली असता त्यांनी कळविले की, त्यांनी दिलेले मुळ दर अत्यंत वाजवी होते. परंतु मंडळाचा मान राखावा म्हणून त्यांनी ३% दर कमी केलेत. पेट्रोल व डिझेलचे दरात वाढ झाल्याने बांधकाम साहित्याचे दरात वाढ झाली आहे हयाचा विचार करून शासन ठेकेदारांना दरात जी वाढ देईल ती वाढ त्यांनाही मिळावी त्यांनी मंडळासमोर मुळ दर ३% ने कमी केलेत म्हणून शासनाकडून पुढे विचारातील होणा-या वाढीचा लाभापासून त्यांना वंचीत करू नये.

ठराव क्र. ३२७

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, मे. लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कं. सोलापूर यांनी वाटाघाटीद्वारे कमी केलेल्या दराची निविदा [म्हणजेच एस्टीमेट दरापेक्षा ११.९५% जास्तीची] मान्य करण्यांत यावी.

विषय क्र. २: " जय जवान जय किसान" सहकारी साखर कारखाना लि. लालबहादुर शास्त्रीनगर, नळेगांव ता. अहमदपुर जि. लातूर येथील कर्मचा-यांसाठी सेवानिवास योजना.

ठराव क्र. ३२८

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, "जय जवान जय किसान" नळेगांव सहकारी साखर कारखान्याने त्यांच्या कर्मचा-यासाठी २२० घराची गृहनिर्माण योजना राबविण्याची विनंती केलेली आहे. परंतु गृहनिर्माणाचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे खालील अटींसह मान्यतेस्तव पाठविण्यांत यावे व जय जवान जय किसान सहकारी साखर कारखान्यास खालीलअटी कळवून (त्यासाठी) त्यांना मान्य असल्याबाबत त्यांच्या कडून सहमती घ्यावी.

१] साखर कारखान्याने योजनेची जमिन प्राधिकरणाच्या ताब्यात द्यावी.

२] लाभधारकांची पात्रता ही प्राधिकरणाच्या नियमानुसार मंडळ निश्चित करेल.

३] जमिनीची किंमत शासकीय धोरणाप्रमाणे संबंधीत खात्याकडून निश्चित करण्यांत येईल व कारखान्याच्या प्रस्तावाप्रमाणे सुरूवातीस भरावयाची रक्कम जमिनीच्या किंमतीपोटी वळती करण्याऐवजी तिची किंमत प्रकल्पाच्या किंमतीत धरण्यातयेईल.

४] योजने अंतर्गत बाहय सुविधा पुरविण्याची जसे रस्ते, पाणी, ड्रेनेज वीज इत्यादी जबाबदारी साखर कारखान्याने घ्यावी व गाळे वाटप झाल्यावर त्याची देखभाल कारखान्यालाच करावी लागेल.

५] गृहनिर्माण योजनेकरिता उपलब्ध होणाऱ्या कर्जाची हमी साखर कारखान्याने राष्ट्रीयकृत बँकेची सादर करावी.

६] योजना पूर्ण झाल्यावर लाभधारकांनी काही कारणामुळे गाळे ताब्यात घेण्यास नकार दिल्यास सर्व गाळे साखर कारखान्याने घ्यावेत व परतफेडीचे हप्ते भरावेत.

७ साखर कारखान्याने गाळेधारकांकडून कर्जाच्या परतफेडीचे हप्ते नियमित वसूल करून मंडळाकडे जमा करावेत.

८] कर्जाचे संपूर्ण हप्ते फिटे पर्यन्त योजनेची जमिन प्राधिकरणाच्या नांवावर राहील.

९] गाळयांची किंमत व उपलब्ध होणारे कर्ज यामधील फरकाची रक्कम गाळेधारकाला भरावी लागेल.

कारखाना जर सदर गृहनिर्माण योजना राबविणार असल्यास योजनेच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २% सेवाशुल्क म्हणून मंडळास द्यावे लागतील.

बैठकीनंतर मा. सभापतींचे आभार मानून सभा संपली.

. . . .